**निशाणी ३१ खाली**

<u>**वादी तर्फे सा.क्र.१ शामराव यशवंता जाधव याचा शपथेवर उलट तपास प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे तर्फे ॲड श्री. एन.बी. सोनवणे यांचे मार्फत सुरु-**</u>

०९. गट क्र. ८४ मधील मिळकत आमची वडीलोपार्जित आहे. गट क्र. ८१ मूधील मिळकत माझ्या वडीलांनी विकत घेतलेली होती. गट क्र. ८४ मध्ये मला , भाऊ उत्तम आणि रामभाऊ यांना हिस्सा मिळालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, घर मिळकत ही देखील आमची वडीलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सन १९९३ मध्ये करण्यात आलेल्या बॉडच्या आधारावर दावा दाखल केलेला आहे.
प्र. तुम्ही घराबाबत तुम्हाला वाटणी मिळाली या बाबत कागद दाखल केला आहे का?
उत्तर- आम्हाला तिघांना कब्जा दिला परंतु त्याबाबत कागदपत्र तयार केलेली नाहीत.

१०. हे म्हणणे खरे आहे की, घरमिळकतीचा ताबा मला दिल्याबाबत मी कागदपत्रे दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या ताब्यात असलेल्या घरमिळकतीच्या चतु:सिमा दर्शवण्याकरीता कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घरमिळकत आजरोजी माझ्या वडीलांच्या नावावर आहे. मी घरमिळकत नावावर करण्याकरीता न्यायालयात वारसाची कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९३ च्या बॉडमध्ये घरमिळकत व जमीनीसंदर्भात उल्लेख केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला तोंडी वाटणी कोणत्या दिनांकास झाली ते सांगता येणार नाही.

११. हे मला सांगता येणार नाही की, माझी पत्नी जाईबाई हिने गोरख आणि गणेश यांच्याविरुध्द गट क्र. ८१ मधील रस्त्याबाबत दि.दा.क्र. ५०/२०१७ न्यायालयात मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. माझे वय जास्त झालेले असल्याने माझी दि.दा.क्र. ५०/२०१७ मध्ये साक्ष नोंदवण्यात आली होती किंवा नाही हे मला सांगता येत नाही. दि.दावा क्र. ५०/२०१७ माझ्या पत्नीने काढूण घेतल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, शेकू जाधव, लक्ष्मण जाधव आणि भिमराव जाधव यांनी मला घरमिळकती बाबत हक्क सोडपत्रक करुन दिलेले नाही.

१२. हे म्हणणे खरे आहे की, मी घरमिळकतीचे मुल्यांकन पत्रक दावा दाखल करतेवेळी दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, इतर भावांचा हक्क हडप करण्याकरीता खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्यास कारण घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा घरमिळकतीचा असल्याने अपूर्ण न्यायालयीन शुल्क भरलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष दिली.

उलट तपास पूर्ण.
<u>प्रतिवादी क्र. ५ ते १२ यांचा पुकारा केला असता गैरहजर. सबब उलट तपास नाही.</u>
उलट तपास पूर्ण.
फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत समक्ष

**(धनंजय एस.देवरे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फुलंब्री**
**दि.१०.०४.२०२४**